**रे.दि.मु.नं.११८/२०१३**
**नि.१०७ लगत**

**उर्वरित उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री.आर.आर. यादव यांचे मार्फत सुरु.**

२२. प्रतिवादी क्र.१ यांना मी साक्षीदार म्हणुन तपासणार आहे किंवा कसे हे माझे विधीज्ञ ठरवतील. सदरचा जबाब मी माझ्या एकटयासाठी देत आहे. मला मराठी थोडेफार लिहता वाचता येते. आता मला निशाणी ७ वरील वाद मिळकतीचा सातबारा उतारा दाखवण्यात आला. सदरचा उतारा सन १९४५-१९४६ अखेरचा आहे हे मला माहीत नाही. निशाणी ७ वरील सातबारा उता-यावर एक लाल रेघ मारलेली आहे.

प्रश्न - सदरच्या निशाणी ७ वरील सातबारा उता-यावरील नोंदीवर आजअखेर कोणत्याही न्यायालयात अपील नाही ?
उत्तर - या कागदपत्रांबद्दल केस दाखल केल्यावर आम्हाला समजले.

२३. वादातील मिळकतींशी माझा कुठलाही संबंध नाही हे म्हणणे खरे नाही. वाद मिळकतीला माझी मालक म्हणुन कोठेही नोंद नाही हे म्हणणे खरे नाही. माझा मुळ पुरुष मानिक मुजावर म्हणुन होते. मानिक मुजावरला किती मुले होती हे मला माहीत नाही. मानिक मुजावर यांच्या पत्नीचे नाव मला माहीत नाही. मानिक मुजावर यांच्या पत्नीचे नाव मैनाबी आहे. मानिक मुजावर व मैनाबी हे पती पत्नी असल्याबाबतचे कागदपत्र मी दाखल करण्यास तयार नाही. मनिक मुजावर व माझा काहीही संबंध नाही हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकतीला मानिक मुजावरचे नाव नोंद असल्याबाबतचा सातबारा उतारा मी अभिलेखावर दाखल केला नाही हे म्हणणे खरे आहे. दावा मिळकतीला मानिक मुजावर याची सुरुवातीपासुन आजअखेर नोंद झाली नाही हे म्हणणे खरे आहे. माझी स्वतःची अथवा वडिलांची दावा मिळकतीला मालक म्हणुन नोंद झाली नाही हे म्हणणे खरे आहे.

२४. दावा दाखल झाल्यापासुन आजअखेर मी दाव्याची व दावा मिळकतीची थोडीफार माहिति घेतली आहे. (साक्षीदार प्रत्येक प्रश्नाची उत्तरे व्यवस्थीत देत नाहीत). वादीने दाखल केलेले दाव्यातील कागद मी पाहिले आहेत. दावा मिळकतीला शंकरराव बाबुराव कुदळे यांच्या नावाची नोंद झाली किंवा कसे हे मला माहीत नाही. शंकरराव यांच्या

नोंदीच्या आधी बाबुराव कुदळे यांच्या नावाची नोंद होती किंवा कसे हे मला माहीत नाही.

प्रश्न - बाबु हरी कुदळे किंवा शंकर कुदळे यांच्या नोंदीच्या विरोधात मी आजअखेर हरकत अथवा तक्रार दाखल केली नाही ?
उत्तर - दाव्यातील कागदपत्रांबद्दल केस दाखल केल्यावर आम्हाला समजले.

२५. सन १९५०-५१ पासुन आजअखेर दावा मिळकतीला बाबु हरी कुदळे यांच्या नावाची नोंद होती किंवा कसे याची मला माहीती नाही. त्या नोंदी विरोधात मी आजअखेर तक्रार केली नाही हे म्हणणे खरे आहे.

२६. दावा मिळकत ही पिर मुबारक देवस्थानची आहे हे म्हणणे खरे आहे. पिर मुबारकचे पहिले वहिवाटदार हे राजमहंमद सुलेमान तर्फे खैरुद्दीन कुद्दबुद्दीन काझी आहेत हे म्हणणे खरे आहे. सदरची नोंद सन १९०० पूर्वी झाली आहे हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकत प्रत्यक्षपणे बाबु हरी कुदळे वहिवाटत असल्याची नोंद १९०० सालापुर्वी झाली आहे हे म्हणणे खरे नाही. दावा दाखल केला तेव्हा मी सर्व उतारे पाहिले आहेत. सन २०१३ पासुन आजअखेर सदरच्या नोंदी कमी व्हाव्यात, अथवा त्या बाबत तक्रार केली नाही कारण सदरचा दावा दाखल होता.
उलटतपास प्रतिवादीचे वकीलांचे विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब.

**समक्ष/ श्रवणोत्तर स्वीकृत**

SMRUTI SAGAR PALSULE

Digitally signed by SMRUTI SAGAR PALSULE
Date: 2025.01.28 16:12:28 +0530

**(एस.एस.पळसुले)**

**दिनांक :- २८.०१.२०२५** **तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर,वाई**